# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३६५४

**अपिलार्थी श्री. इक्बाल आर खान**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (विशा-४)**
गृह विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
गृह विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.११.२०२४</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०१.२०२३ | ३०.०१.२०२३ व ०२.०२.२०२३ | २२.०२.२०२३ | २३.०३.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.११.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २३.०३.२०२३ संलग्न केले आहेत.

अर्जदाराने त्यांच्या दिनांक ०९.०१.२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये भारत सरकारद्वारे दि. १४.०६.२०१३ रोजी पारीत करण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने माहिती अधिकार कार्यकर्ते यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षेविषयी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याचे कारण देऊन अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी, गृह विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी गृह विभाग यांनी दिनांक २३.०३.२०२३ रोजी अपिलार्थींचा अर्ज पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आला असल्याचे नमूद करुन प्रथम अपील नाकारण्यात आले.

असमाधानकारक आदेश पारीत करण्यात आल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांनी द्वितीय अपील दाखल केले.

..२/-

द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी , गृह विभाग व पोलीस महासंचालक कार्यालयातून वरिष्ठ कार्यासन अधिकारी उपस्थित आहेत.

पोलीस महासंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी गृह विभाग यांनी अपिलार्थींचा अर्ज कलम ६(३) अन्वये त्यांचे कार्यालयाकडे वर्ग केला होता व त्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दिनांक ३०.०१.२०२३ व दि. ०२.०२.२०२३ रोजी उत्तर देण्यात आले होते की, शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीआरटीआय २००५/सी आर २६५/०५/५ दिनांक ११.१०.२००५ नुसार केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २४(४) अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयांच्या विशेष शाखा व सर्व जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या जिल्हा विशेष शाखा यांना अधिनियमातील तरतुदी लागू नाहीत. संरक्षण व सुरक्षा विभाग हा विशेष शाखेचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणास उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

या पत्राच्या आधारे अपिलार्थी यांनी पोलीस महासंचालक कार्यालयातील प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी दोन ठिकाणी प्रथम अपील दाखल केले आहे. अपिलार्थींना गृह विभाग व पोलीस महासंचालक यांचे कार्यालय या दोन्ही कार्यालयातून उत्तर प्राप्त झालेली आहेत. परंतू द्वितीय अपील करताना त्यांनी ते कोठेही नमूद केले नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, पोलीस महासंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची भूमिका योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Greater Mumbai *

27-11-2024

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**